# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांकःरानिआ/जिपपंस/२०१०/प्र.क्र.९/का.७
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३०/११/२०१०

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी विहित रितीने खर्चाचे हिशोब सादर न केल्यास त्यांना अनर्ह घोषित करण्याबाबतचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१९/११/२०१० चे आदेश

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भांकित आदेशान्वये खाली नमूद केलेले अधिकार संबंधित विभागीय आयुक्त व संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत :-

१) जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारीत केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रितीने सादर न केल्यास अशा उमेदवारास सदस्य म्हणून राहण्यास किंवा असा सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास निरर्ह ठरविण्याबाबतचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

२) वर नमूद केलेल्या निरर्हता दूर करण्याबाबतचे किंवा निरर्हतेचा कालावधी कमी करण्याबाबतचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत.

संदर्भांकित आदेश दिनांक १९/११/२०१० च्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले असून राजपत्राची प्रत पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

आपला,

(नि.ज.वागळे)
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) राजपत्राच्या १० प्रतींसह तहसिलदार का.८, राज्य निवडणूक यांना माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२) उप आयुक्त/सहायक आयुक्त/अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
३) सहपत्रासह सर्व कार्यासने, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

RNI No. MAHBIL/2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक ४६] शुक्रवार, नोव्हेंबर १९, २०१०/कार्तिक २८, शके १९३२ [पृष्ठे १, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक १२०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ नोव्हेंबर २०१०

आदेश

जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी विहित रितीने खर्चाचे हिशोब सादर न केल्यास त्यांना अनर्ह घोषित करण्याबाबतचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

क्रमांक रानिआ/जिपपंस. २०१०/प्र.क्र. ९/का-७.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के अन्वये तसेच महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ९ अ (२) व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १० अ (२) अन्वये प्राप्त झालेल्या तसेच या संदर्भातील प्राप्त झालेल्या इतर अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र पुढीलप्रमाणे आदेश देत आहेत :—

(अ) महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील १५ख. (१) व कलम ६२क (१) चे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच कलम १५ख (२) व कलम ६२क (२) चे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

(ब) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मधील कलम १४ख (१) चे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच कलम १४ख (२) चे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

चाँद गोयल,
अपर मुख्य सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.



भाग एक-अ (म.उ.वि.)—१२०-१

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.